MHKO110002242016

**नियमित दिवाणी दावा क्र. २६/२०१६.**
(CNR No. MHKO110002242016)

## निशाणी क्रमांक २०४ खालील आदेश.

(बालेचांद मणेर वि. द्रौपदी बुरुड वगैरे)

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७, नियम १ नुसार निशाणी क्र.१८४ वरील आदेशाचे पुनरर्विलोकन (Review) होण्यासाठी केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार, दिनांक ०८/०५/२०२५ रोजी वादी यांचा निशाणी क्र.१८४ चा अर्ज मंजूर करताना, न्यायालयाने अनेक बाबींचा विचार केलेला नाही. तसेच, सदरचा आदेश चुकीचा असून तो प्रतिवादी यांच्यावर अन्यायकारक आहे. प्रकरणातील पूर्वीचा निशाणी क्र.१२७ वरील अर्ज व निशाणी क्र.१८४ वरील अर्जामधील सर्व कथने एकच आहेत. तसेच निशाणी क्र.१२७ वरील अर्ज न्यायालयाने मंजूर केल्यानंतर वादी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्यासमोर रिट अर्ज क्र.३१२४/२०२३ दाखल केला होता. त्यामध्ये वादीच्या बाजूने कोणताही आदेश पारित करण्यात आला नाही. तरीदेखील वादी यांनी न्यायालयात खोटी माहिती दिली आहे. सदर अर्जाच्या वेळी दावा मिळकतीमधील प्रतिवादी यांची गेली सात वर्षांपासूनच्या शांततामय कब्जे वहिवाटीचा कोणत्याही प्रकारे विचार करण्यात आलेला नाही.

०३. तसेच, सदर निशाणी क्र.१२७ व निशाणी क्र.१८४ वरील अर्जांच्या आधारे वादी यांना प्रतिवादी यांचा दावा मिळकतीमधील कब्जा काढून घेण्याचा अधिकार नाही. कारण, निशाणी क्र.१८४ वरील अर्जाच्या चौकशीवेळी प्रतिवादी यांच्या प्रतिदाव्याचा व दाखल कागदपत्रे यांचा विचार न्यायालयाने केलेला नाही. तसेच, वादीच्या विधिज्ञांनी न्यायालयावर वेगवेगळ्या प्रकारे दबाव टाकून सदरचा आदेश पारित करून घेतला आहे. यासर्व कारणांसाठी प्रतिवादी यांनी दिनांक ०८/०५/२०२५ रोजीचा निशाणी १८४ आदेश रद्द होण्याबाबत विनंती केली आहे.

०४. वादी यांनी निशाणी क्र.२२० वर सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार, अर्जातील सर्व मजकूर खोटा, चुकीचा व बनावट असून तो वादींना मान्य नाही. प्रस्तुत दावा दाखल करून वादी यांनी दावा मिळकतीमध्ये वादीच्या वहिवाटीस हरकत व अडथळा करू नये या करिता तूर्तातूर्त मनाई अर्ज दाखल केला होता व तो न्यायालयाने मंजूर केला होता. सदर आदेशाच्या विरोधात प्रतिवादी यांनी दाखल केलेले अपील देखील नामंजूर करण्यात आले होते. त्यानंतर देखील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करणे चालूच ठेवले. सबब वादी यांनी निशाणी क्र.१८४ अर्ज सादर करून पोलीस संरक्षणाची मागणी केली. सदर अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे व लेखी युक्तिवाद सादर केला. त्या सर्व बाबींचा विचार होऊन सदरचा अर्ज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी मंजूर केला आहे.

०५. वादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, सदर निशाणी क्र.१८४ वरील आदेश हा पूर्ण चौकशीअंती गुणदोषांवर निर्णीत करण्यात आला आहे. तसेच, प्रतिवादी यांनी सदर अर्जाच्या विरोधात अपील करण्याची संधी असताना देखील त्यांनी सदरचा अर्ज सादर केला आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार होऊन प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

०६. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे तसेच वादी तर्फे दाखल लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले. प्रकरणातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०७. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११४ मध्ये पुनर्विलोकनाबाबत खालील प्रमाणे विवेचन दिलेले आहे.

> **114. Review**.—Subject as aforesaid, any person considering himself aggrieved—
>
> (a) by a decree or order from which an appeal is allowed by this Code, but from which no appeal has been preferred.
>
> (b) by a decree or order from which no appeal is

allowed by this Code, or

(c) by a decision on a reference from a Court of Small Causes,

may apply for a review of judgment to the Court which passed the decree or made the order, and the Court may make such order thereon as it thinks fit.

०८. प्रतिवादी तर्फे विधिज्ञांनी निशाणी क्र.२८ वरील कैफियत व त्यामधील प्रतिवादी यांचा ताबा, तसेच त्यांनी केलेला प्रतिदावा यामध्ये प्रतिवादी यांनी दाव्याबाबतचे केलेले कथन, नकाशा हे निशाणी क्र.१८४ वरील आदेश पारित करताना विचारात घेण्याची आवश्यकता असल्याचा युक्तिवाद मांडला. त्याचप्रमाणे निशाणी क्र.१२७ व निशाणी क्र.१८४ मधील कथने देखील सारखीच असल्यामुळे, त्यांचा देखील विचार निशाणी क्र.१८४ वरील आदेश पारित करताना घेतला नसल्याचे नमूद केले आहे. तसेच, प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या न्यायनिर्णयानुसार पोलीस संरक्षणाने ताबा घेता येणार नाही, असा देखील युक्तिवाद मांडून त्याचा विचार देखील आदेश पारित करताना झाला नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे, थोडक्यात निशाणी क्र.१८४ वरील आदेश पारित होताना पारदर्शकता राहिलेली नाही, त्यामुळे त्या आदेशाचे पुनरर्विलोकन होणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद प्रतिवादी यांनी मांडला आहे. वादीने निशाणी क्र.२१६ वर पुरसीस सादर करून त्यांनी यापूर्वी प्रस्तुत अर्जास सादर केलेले म्हणणे हाच युक्तिवाद समजण्यात यावा असो नमूद केले आहे. तसेच, पुनरर्विलोकनाबाबत कोणताही मुद्दा युक्तिवादादरम्यान सांगितला नसल्याचे नमूद करत, मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या **Dinesh Krishnarao Kohare Vs. State of Maharashtra and others 2026(1) Mh.L.J. 513** ह्या न्यायनिर्णयाचा आधार घेऊन पुनरर्विलोकनाचे स्वरूप हे मर्यादित स्वरूपाचे असल्याचे नमूद केले आहे.

०९. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ११४ व आदेश ४७ मधील पुनरर्विलोकनाच्या तरतूदींचे अवलोकन केले असता, एखादी नवीन महत्त्वाची बाब किंवा पुरावा जो वेळेत प्राप्त झाला नाही, अथवा दक्ष राहूनही वेळेत मिळवता आला नाही, जो आदेश किंवा न्यायनिर्णय झाल्यानंतर प्राप्त झाला, अशी वस्तुस्थिती असल्यास, अपील केले नसल्यास, सदर आदेश किंवा न्यायनिर्णयाचे पुनरर्विलोकन करण्याबाबतची तरतूद असल्याचे

दिसून येते.

१०. प्रस्तुत प्रकरणातील निशाणी क्र.२०४ वरील अर्जातील कथनांचा, युक्तिवादांचा विचार करता, अशी कोणतीही वस्तुस्थिती समोर येत नाही. युक्तिवादादरम्यान उपस्थित केलेले मुद्दे हे पूर्वीदेखील उपलब्ध होते. कोणताही नवीन मुद्दा समोर येताना दिसत नाही. त्यामुळे, निशाणी क्र.१८४ वर पारित झालेल्या आदेशाचे पुनरर्विलोकन करण्याचे कोणतेही औचित्य किंवा आवश्यकता राहात नाही. सबब, अर्ज खर्चासह फेटाळण्यास पात्र राहातो. करिता मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.05.08 17:48:17 +0530

दिनांक. ०८/०५/२०२६. **(श्रीनिवास अ. कुलकर्णी)**
पेठवडगांव. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेठवडगांव.